# यहोशवा देवाच्या लोकांसाठीचा शिस्तीचा आदर्श

मुलांना शिकवणाऱ्यांनी C6b हा अभ्यास वाचावा.


**प्रार्थना :** ''प्रिय देवा, आमचा अपमान करणाऱ्यांना येशूने सांगितलेल्या मार्गाने सुधारुन पूर्ववत पूर्वपदी ठेवण्यास साहाय्य कर.''

## 1. चुकणाऱ्या विश्वासणाऱ्यांना पुन्हा पूर्वपदी आणण्यासाठी प्रार्थनापूर्वक तयारी करा.

पाहा **यहोशवा 1:6-11** मध्ये देवाने शिस्त-व्यवस्थितपणा राखण्यासाठी यहोशवाला काय सांगितले.

देवाने आपल्या लोकांची ईजिप्तच्या गुलामगिरीतून सुटका केली. त्यानंतर त्यांनी देवावर विश्वास ठेवला नाही म्हणून देवाने त्यांना चाळीस वर्ष रानात भटकायला लावले. त्यांचा नेता मोशे मरण पावण्यापूर्वीच त्याने यहोशवाला वचनदत्त भूमी घेण्यासाठी तयार केले. हा प्रदेश अब्राहामाच्या संतानाला देण्याचे अभिवचन देवाने दिले होते. ही सैनिक कारवाई करताना यहोशवाने शिस्त राखली. यहोशवा अध्याय 5-8 मधील उदाहरण वाचा.

पातक करीत राहणाऱ्या विश्वासणाऱ्यांना सुधारणे हे अत्यंत कठीण काम तुम्हांला करावे लागणार आहे, हे काम आम्ही मोठया सहनशीलनेने आणि प्रीतीने करणे अगत्याचे आहे. शास्त्रलेख आणि पवित्र आत्मा तुमचे मार्गदर्शन करो. आफ्रिकेतील एका खेडयात एक वडीलजन भेटी देण्यास गेले होते. एका घरी ते गेले असताना त्यांचे यजमान जोरात ओरडले, ''थांबा! हळूहळू मागे जा!'' एक दोन मीटर लांबीचा काळाकुट्ट नाग बिछान्यावर बसला होता. हा नाग थुंकणारा होता. ''याला कसे बाहेर काढायचे हे मला माहित नाही'' असे म्हणून त्याने दार लावून घेतले. ''तो माझ्या डोळयात विष थुंकून मग चावा घेईल.'' परंतु खेडयातील त्या माणसाला सापाला दूर कसे करायचे ते माहित होते. त्याने तो साप बाजूला करुन घर पुन्हा सुरक्षित केले.



तुमच्या मंडळीतील पाप हे विषारी सापासारखे आहे. तुम्ही ते तसेच ठेवले तर ते प्रत्येकाला दंश करील. ते कसे दूर करायचे हे तुम्हांला माहित असलेच पाहिजे अन्यथा ते तुम्हांलाही दंश करील

आमच्या मंडळीतील पाप कसे दूर करायचे आणि अपराध करणाऱ्याला पुन्हा पूर्वपदावर कसे आणायचे हे येशूने **मत्तय 18:15-18** मध्ये सांगितले आहे.

**पाहा मत्तय 18:15 मध्ये** अपराध करणाऱ्याला सुधारण्यासाठी आपण प्रथम काय केले पाहिजे.

- आपण कोणाला सुधारले पाहिजे?

*(उत्तर : ''भावाला,'' आपण ख्रिस्तामधील भावाला सुधारले पाहिजे. ख्रिस्तरूपी शरीराच्या-मंडळीच्या बाहेरील लोकांवर मेंढपाळ पाळकांचा काहीही अधिकार नसतो. एखादी व्यक्ती विश्वाणारी आहे याबद्दल तुमची खात्री नसेल तर मग काहीही करु नका).*

- आपण कशात सुधारणा केली पाहिजे?

*(उत्तर : ''समजा एखाद्या बंधुने तुमच्याविरुद्ध पातक केले.'' त्याने पाप करण्याचा अपराध केला असल्याची तुमची खात्री आहे का? समजा, कोणाचे तरी ऐकून तुम्ही एखाद्याला दोष दिला-आरोप केले तर तुम्ही त्याला दुखावता, एक मेंढपाळ-पाळक म्हणून त्याचा तुमच्यावरील विश्वास उडून जाईल).*

- अपराध करणाऱ्याशी प्रथम कोणी बोलावे?

*(उत्तर : ''तुमच्या विरुद्ध पाप करणारा'' भाऊ. दुखावलेल्या विश्वासणाऱ्याने प्रथम स्वत:च दुसऱ्या विश्वासणाऱ्याशी बोलून समस्या सोडवण्याचा प्रयत्न केला पाहिजे. इतर लोकांबरोबर समस्येविषयी चर्चा करण्यापूर्वी विश्वासणाऱ्यांना दुखावणाऱ्या लोकांशी बोलण्याचे शिक्षण द्या. विश्वासणाऱ्यांना दुखावणाऱ्या लोकांशी बोलण्याचे शिक्षण द्या. विश्वासणाऱ्यांमधील नातेसंबंध त्यांना स्वत:ला सुधारता आले नाहीत तर हे नाते पूर्ववत जोडण्यासाठी मेंढपाळ पाळकांनी साहाय्य करावे).*

- दुखावल्या गेलेल्या व्यक्तीने आपल्या दु:खाविषयी कोणाला सांगावे?

*(उत्तर : ''तुम्ही दोघे एकांती असताना त्याचा अपराध त्याला दाखीव.'' हे फार महत्त्वाचे आहे! दुखावल्या गेलेल्या व्यक्तीने दुखावणाूयाकडे गुप्तपणे कोणालाही न सांगता गेले पाहिजे. हे समोरा समोर येणे कठीण असले तरी यात पवित्र आत्मा आपले साहाय्य करतो. मेंढपाळ पाळक या नात्याने तुम्ही एकांतात लोकांना त्यांच्या चुका दाखवून दिल्या पाहिजेत. समस्यां विषयी कोणाशीही अगदी तुमच्यापत्नीशीही चर्चा करु नका. सूज्ञ समंजस पाळक चुका दुरुस्त करण्याचे समुपदेशनाचे सत्र एकांतातच घेतात. एकांतात किती पातकांचा निकाल लावला हे अन्य कोणालाही समजण्याची गरज नाही).*

- विश्वासणारा सुधारणा करण्याकडे लक्ष पुरवले तर काय परिणाम होतील?

*(उत्तर : ''त्याने तुझे ऐकले तर तू आपला भाऊ मिळविलास असे होईल. योग्य प्रकारे काळजीपूर्वक सुधारणा केली तर आमच्या भावाशी आमचे नातेसंबंध दृढ होतात. आमच्या मुलांमध्ये सुधारणा करण्याची आवश्यकता असते तेव्हा आपण त्यांना शिस्त लावतो, कारण आपले त्यांच्यावर प्रेम असते. आम्हांला त्यांच्याबद्दल प्रेम वाटते म्हणूनच आम्ही त्यांना शिस्त लावतो याची त्यांना खात्री द्या. अशाच प्रकारे आम्ही दुखावणाूयांना सुधारतो ते त्यांना शिक्षा करण्यासाठी नाही तर त्यांना पुन्हा पूर्वपदावर आणण्यासाठी).*

अपराध करणारा तुमच्या बोलण्याकडे लक्ष देत नसेल तर पुढे काय करायचे ते **मत्तय 18:16** मध्ये पाहा.

*(उत्तर : आम्ही अपराध करणाूयाशी साक्षीदारांच्या समोर बोलावे).*

अपराध करणारा चूक मान्य करुन सुधारण्यास तयार नसेल तर शेवटी काय केले पाहिजे ते **मत्तय 18:17** मध्ये पाहा.

*(उत्तर : पाळकांनी अपराध करणाूयाला मंडळीसमोर त्याची चूक दाखवून द्यावी. त्याने मंडळीच्या बोलण्याकडे दुर्लक्ष केले तर विश्वाणाूयांनी त्याच्या बरोबर सहभागिता ठेवू नये. तो पश्चात्ताप करीत नाही तोवर त्याच्याबरोबर प्रभुभोजन घेऊ नये. पण त्याने पश्चात्ताप करताच ताबडतोब त्याला मंडळीत घ्या, अन्यथा तो दु:खसागरात बुडून जायचा (2 करिंथ 2:6-7).*

विश्वासणाूयांमध्ये फूट पाडणाूया व्यक्तींचे आपण काय करावे ते **तीत 3:10-11** मध्ये पाहा.

**गलती 6:1** मध्ये पाहा

- अपराध करणारा प्रथम आपल्या एकटयाचे ऐकत नसेल तर आपण कोणत्या लोकांना बरोबर घेऊन जावे.
- एखाद्याची चूक सुधारतांना आम्ही कशाची काळजी घेतली पाहिजे.

पाहा **प्रे.कृ. 20:28-31** मध्ये पौल वडीलजनांना कशावर लक्ष ठेवायला सांगतो आणि 'लांडगे' काय करतील.

## 2. सहकाूयांशी चर्चा करुन आठवडयातील कार्यक्रम

एखाद्या विश्वाणाूयाच्या विरुद्ध कोणाची तक्रार असेल तर येशूने सांगितल्याप्रमाणे करा (भाग 1, वरीलप्रमाणे)

भेट देऊन 'लांडग्यांचा' दृढपणे सामना करा.

चूक करणाूया विश्वासणाूयांशी बोलण्यापूर्वी सौम्यपणाचा आत्मा व धैर्य मिळण्यासाठी प्रार्थना करा. गलती 9:1 हे वचन असेच सांगते.

पूर्ववत पूर्वीच्या स्थानी परत येण्याची आवश्यकता असणाूया कोणत्याही विश्वासणाूयासाठी व त्याच्यासमवेत प्रार्थना करा.

## 3. सहकाूयांशी चर्चा करुन येणाूया उपासना सभे विषयी योजना आखा.

यहोशवाने इस्राएल लोकांना कशी शिस्त लावली याचा वृत्तांत थोडक्यात सांगा वा नाट्यीकरण करा.

बेशिस्त विश्वासणाृयांमध्ये सुधारणा करुन त्यांना पूर्वस्थानी परत आणण्याच्या पायृया स्पष्ट करा. वरील भाग 1 मधील प्रश्न विचारा.

शरीररूपी ख्रिस्तामधील शिस्तीचा हेतू स्पष्ट करा.

- लोकांनी मानवी नियम पाळावेत म्हणून नाही तर येशूच्या आज्ञा पाळण्यास मदत व्हावी यासाठी शिस्त आवश्यक आहे.
- चुकणाृया विश्वासणाृयांस शिक्षा करु नये तर आम्ही त्यांना सुधारुन पूर्वस्थानी परत आणले पाहिजे. यहोशवाच्या काळात इस्राएल ''जिवे मारणाृया लेखाच्या'' (2 करिंथ 3:6) नियंत्रणाखाली होते. परंतु येशू आल्यापासून आपण कृपेच्या आधीन आहोत.

मुलांनी तयारी केलेली नाटिका. कविता व प्रश्न सादर करण्यास सांगा. प्रभुभोजनाची ओळख करुन देण्यासाठी 1 करिंथ 11:23-30 वाचा. अयोग्य प्रकारे भाकरी मोडणाृयांना देव कसे शासन करतो ते स्पष्ट करा. ते शरीररूपी ख्रिस्ताचा अपमान करतात. शरीर म्हणजे तीन गोष्टी, देव त्यांचा एकत्रित विचार करतो. वधस्तंभावर दु:खसहन करणारे येशूचे शरीर, एकत्रित होऊन भाकरी मोडणार विश्वासणाृयांचे शरीर आणि भाकरी ज्याला येशूने ''हे माझे शरीर आहे'' असे म्हटले.

दोन किंवा तीन जणांचे गट करा, आठवडयाच्या विषयावर चर्चा करा आणि ख्रिस्तरूपी शरीरामध्ये पवित्रता व शिस्त राखण्यासाठी देवाने मदत करावी याकरीता प्रार्थना करा.

पातक करणाृया विश्वासणाृयाची येशूच्या नियमाप्रमाणे सुधाारणा करुन पूर्ववत पुन:स्थापना केली असेल आणि याबद्दल त्याला जाहिरपणे देवाची स्तुती करायची असेल तर त्याला तसे करु द्या.

**पाठ करा गलती 6:1**

Copyright 2004 © by Paul-Timothy. May be freely copied. Download from www.Paul-Timothy.net